निविदा क्र.
निर्माल्य तेल विक्री करणे

# श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) ता.नेवासा, जि.अहिल्यानगर

निर्माल्य तेल विक्री (२०२६-२७) श्री शनैश्वर देवस्थानच्या मालकीच्या शिंगणापूर येथील परिसरात शनि देवाच्या स्वयंभू मूर्तीला भाविकांनी अर्पण केलेले निर्माल्य तेल (खाण्याव्यतिरिक्त व धार्मिक विधी व्यतिरिक्त वापरासाठी) ११ महिन्यांच्या कराराने दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या कालावधीत परवाना पद्धतीने प्रति किलो ग्रॅम दराप्रमाणे 'आहे त्या स्थितीत' (As is where is basis) विक्री करण्यासाठी अनुभवी निविदाधारकांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

## निविदा अर्ज

निर्माल्य तेल विक्री (२०२६-२७) श्री शनैश्वर देवस्थानच्या मालकीच्या शिंगणापूर येथील परिसरात शनि देवाच्या स्वयंभू मूर्तीला भाविकांनी अर्पण केलेले निर्माल्य तेल (खाण्याव्यतिरिक्त व धार्मिक विधी व्यतिरिक्त वापरासाठी) ११ महिन्यांच्या कराराने दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या कालावधीत परवाना पद्धतीने प्रति किलो ग्रॅम दराप्रमाणे 'आहे त्या स्थितीत' (As is where is basis) विक्री करण्यासाठी नियम अटी व शर्ती खालील प्रमाणे ..

---

**निविदा वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | निविदा घोषणा दिनांक व वेळ | २०.०४.२०२६ सकाळी १०.०० वा. |
| २ | निविदा पूर्व बैठक दिनांक व वेळ | २२.०४.२०२६ सकाळी १०.०० वा. |
| ३ | निविदा दस्तऐवज मिळविण्याची अंतिम दिनांक व वेळ | २६.०४.२०२६ सायं.०५.०० वा. |
| ४ | निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ | २६.०४.२०२६ सायं.०५.०० वा. |
| ५ | तांत्रिक लिफाफा उघडण्याची दिनांक व वेळ | २७.०४.२०२६ सकाळी १०.०० वा. |
| ६ | आर्थिक लिफाफा उघडण्याची दिनांक व वेळ | २७.०४.२०२६ दुपारी ३.०० वा. |

**<u>A.लिफाफा क्रमांक १ : तांत्रिक लिफाफा</u>**

१. निविदाधारकाने मतदान ओळखपत्र/आधारकार्ड / ड्राईव्हींग लायसेन्स या पैकी एकाची झेरॉक्स प्रत जमा करणे अनिवार्य राहील.

२. निविदाधारकाने अद्यावत दुकान नोंदणी दाखला (शॉप ॲक्ट) / उद्यम आधार परवाना जमा करणे अनिवार्य राहील.

३. GST नोंदणी दाखला जमा करणे अनिवार्य राहील.

४. पॅन कार्ड जमा करणे अनिवार्य राहील.

५. निविदा अर्जाची रक्कम व बयाणा रक्कम भरलेल्या पावतीची सत्य प्रत निविदा अर्जा सोबत तांत्रिक लिफाफ्यात न जोडल्यास संबधित निविदा धारकाची निविदा अपात्र ठरविण्यात येईल याची निविदाधारकाने नोंद घ्यावी.

६. लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा सादर करताना सीलबंद पाकिटावर ज्या व्यवसाया करिता निविदा अर्ज भरावयाचा आहे त्या व्यवसायाचे नाव,गाळा नंबर, स्वत:चे संपुर्ण नाव, पत्ता व फोन, मोबाइल नंबर, इ.माहीती स्पष्टपणे नमूद करावे.

७. लिफाफा क्र.१ मधील तांत्रिक निविदे मध्ये पात्र झालेल्या निविदा धारकांच्याच लिफाफा क्र.२ मधील दरा संबधिच्या निविदा उघडण्यात येतील.

८. निविदा अर्जातील परिशिष्ठ “अ” (निविदा धारकाबाबतची माहिती), परिशिष्ठ “ब ” (तांत्रिक निविदेमधील कागदपत्रे) (चेक लिस्ट), परिशिष्ठ “ड” (स्वयंघोषणा पत्र), परिशिष्ठ “इ” (श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) यांना निविदा धारकाने द्यावयाचे बंधपत्र) , परिशिष्ठ “ई” (शनिदेवावर पूर्ण श्रद्धा,भक्ती आणि आस्था असल्याचे हमीपत्र) बाबतचे सर्व प्रपत्र तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे अनिवार्य आहे.

९.जाहिरात प्रसिध्द केल्या पासून कोरे निविदा अर्ज देवस्थान कार्यालयात कार्यालयीन वेळेत रोख रक्कम भरणा करून मिळतील अथवा देवस्थानचे संकेत स्थळ www.shanidev.com. येथून डाऊन लोड करता येतील.निविदा अर्जाची किंमत रू.१५००.०० (एक हजार पाचशे रूपये मात्र) जीएसटी सह विनापरतावा आहे. रोख स्वरुपात सदर निविदा अर्ज देवस्थानचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत सूटी खेरीज लेखा विभागात मिळतील. अथवा शनैश्वर देवस्थान शनि शिंगणापूर शाखा सोनई येथील खाते क्र.६०५५१८७२०३५ (IFSC Code MAHB0001391) वर RTGS /NEFT/online द्वारे जमा करावी त्याची पावतीची सत्य प्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे अनिवार्य राहील. बयाणा रक्कम रूपये ५,००,०००.०० (अक्षरी रूपये पाच लाख मात्र) फक्त राष्ट्रीयकृत बॅंकेच्या डिमांड ड्राफ्ट किंवा पे ऑर्डरने, shri shanishwar Devasthan या नावानेच अथवा महाराष्ट्र बॅंक शाखा सोनई येथील खाते क्र.६०५५१८७२०३५ (IFSC Code MAHB0001391) वर RTGS /NEFT/online द्वारे जमा करावी त्याची पावतीची सत्य प्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे अनिवार्य राहील.

**B.लिफाफा क्र २ – दरा संबंधीचा लिफाफा**

१.परिशिष्ठ “क” मध्ये नमूद केल्या नुसार निविदा धारकाने स्वत: स्वाक्षरी केलेला दरा संबंधीचे प्रपत्र दरा संबंधीचा लिफाफा क्र.२ मध्ये सीलबंद करून सादर करावे.

२.लिफाफा क्र.२ दरा संबंधीचा लिफाफा सादर करताना सीलबंद पाकिटावर ज्या व्यवसाया करिता निविदा अर्ज भरावयाचा आहे त्या व्यवसायाचे नाव,गाळा नंबर, स्वत:चे संपुर्ण नाव, पत्ता व फोन, मोबाइल नंबर, इ.माहीती स्पष्टपणे नमूद करावे.

३.दरा संबंधीचे परिशिष्ठ सह प्रत्येक पानावर स्वाक्षरी केलेली मुख्य निविदा दरा संबंधीचा लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावी लागेल.

**C. निविदाधारकांसाठी सूचना –**

१.निविदा धारकांना निविदा अर्ज दि.२०.०४.२०२६ ते दि.२६.०४.२०२६ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत देवस्थानचे लेखा विभागात कार्यालयीन वेळेत विकत घेता येतील. अथवा देवस्थानचे संकेत स्थळ www.shanidev.com. येथून डाऊनलोड करता येतील.

२.सिलबंद निविदा दि.२६.०४.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा. पर्यंत संगणक विभाग, प्रशासकीय कार्यालय येथे स्विकारण्यात येतील.

३. देवस्थान कार्यालयात वर नमुद तारखेस व वेळेत जमा झालेल्या तांत्रिक लिफाफा दिनांक २७.०४.२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. उघडण्यात येतील. त्याच दिवशी आर्थिक/दरा बाबतचा लिफाफा दुपारी ३.०० वा.उघडण्यात येईल मात्र तांत्रिक लिफाफा बाबत प्रश्न निर्माण झाल्यास आर्थिक/दरा बाबतचा लिफाफा उघडणे बाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. या दरम्यान निविदाधारक यांना उपस्थित राहता येईल.मात्र निविदा धारक उपस्थित नसल्यास त्यांचे अनुपस्थिती मध्ये निविदा उघडण्यात येतील व नंतर या बाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

४.ज्या व्यवसाया करिता निविदा अर्ज भरावयाचा आहे त्या व्यवसायाचे नाव,गाळा नंबर, स्वत:चे संपुर्ण नाव, पत्ता व फोन, मोबाइल नंबर, बयाणा रक्कम भरल्याचा पावती नंबर इ.माहीती निविदा अर्जा मध्ये त्याच प्रमाणे सिलबंद निविदा अर्ज पाकिटावर नमूद करावी.एका पेक्षा जास्त निविदा अर्ज सादर करताना प्रत्येक निविदा अर्ज सिलबंद स्वतंत्र पणे सादर करणे आवश्यक असेल

५.दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या कालावधी साठी मंजूर झालेल्या निविदेची एकूण परवाना शुल्काची ( एकूण ११ महिन्यांच्या कालावधीची रक्कम ) रक्कम आगाऊ भरून व शासनाने निश्चित केलेल्या नुसार करारनामा करून दिल्यानंतरच प्रत्यक्ष व्यवसायाचा ताबा देण्यात येईल.

६.तेल घेऊन जाण्यासाठी मंजूर निविदा धारकाकडून येणाऱ्या रिकाम्या टँकर चे वजन व तेल भरुन झाल्यानंतरचे वजन दोन वेगवेगळ्या वजन काट्यावर करावयाचे आहे. वजनकाट्याचे फि मंजूर निविदा धारकाला द्यावयाचे आहे.

७.तेलाचे वजन किलो दराची जीएसटी(GST) सह होणारी एकूण रक्कम, तेल टँकर घेऊन जाण्यापूर्वी देवस्थानचे बँक खात्यात जमा करावयाची आहे. संपूर्ण रक्कम जमा झाल्याची खात्री झाल्यानंतरच तेल टँकर देवस्थान कॅम्पस मधुन बाहेर सोडला जाईल.

८.श्री शनि देवाचे स्वयंभू मुर्तीला भाविकांनी खाद्य तेल अर्पण केल्यानंतर निर्माल्य झालेले तेल साठविण्यासाठी देवस्थान यांनी एक छोटा तेल साठवण (सेग्रीगेशन) टँक तयार केलेला आहे.त्याची साठवण क्षमता नुसार निर्माल्य तेलाचा साठवण (सेग्रीगेशन) टँक पुर्ण भरून वाहून जाण्याच्या आत त्या तेलाची योग्य ती विल्हेवाट मंजूर निविदा धारक यांनी वेळीच करावयाची आहे. जर निर्माल्य तेल साठवण (सेग्रीगेशन) टँक पुर्ण भरून वाहून गेल्यास त्यामुळे देवस्थानचे तेलाचे अथवा कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्यास मंजूर निविदाधारक जबाबदार राहिल. झालेल्या नुकसानीच्या तुलनेत नुकसानभरपाईची रक्कम मंजुर निविदाधारकास नुकसान भरपाई म्हणून तात्काळ भरणा करावी लागेल.

९. मंजूर निविदाधारकाला तेलाच्या साठवण (सेग्रीगेशन) टँक मध्ये तेल व पाणी वेगळे करण्यासाठी लागणारी इलेक्ट्रीक मोटार आणि आवश्यक कर्मचारी स्वखर्चाने नेमावे लागतील. तसेच इलेक्ट्रीक मोटार, तत्संबंधीत उपकरणे हे स्वखर्चाने आणावे लागतील.

१०. सदरील तेल हे निर्माल्य स्वरूपाचे असून त्यामध्ये पाणी व इतर घटक मिश्रीत असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सदरील तेलाचा खाद्य तेल अथवा खाद्य बाब म्हणून वापर अनुज्ञेय नाही. त्यामुळे सदरील तेल कोणत्याही धार्मिक बाबी साठी अगर कुठल्याही खादय तेल पुरवठा करणाऱ्या कंपनीस किंवा व्यापाऱ्यास देता येणार नाही अथवा निविदा धारकास वापरता येणार नाही. या अटीचे मंजूर निविदा धारकाने काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.मंजूर निविदा धारक यांनी या अटीचे उल्लंघन करून सदर निर्माल्य तेलाचा कोणत्याही प्रकारचा गैरवापर केल्याने शासनाच्या कुठल्याही विभागाने कुठल्याही प्रकारची कारवाई केल्यास झालेल्या कारवाईस मंजूर निविदा धारक सर्वस्वी जबाबदार राहतील.देवस्थान संस्था या बाबतीत कुठल्याही प्रकारची जबाबदारी स्विकारणार नाहीत.

११.या व्यवसायाचे संदर्भात आवश्यकता असल्यास सदर काम करण्याकरिता लागणारा शासनाचा योग्य त्या विभागाचा आवश्यक तो परवाना घेणे व या संदर्भात शासनाचे नियम व कायद्याचे पालन करणे तसेच यासाठी शासनाकडे योग्य त्या प्रकारच्या करांचा भरणा करणे व इतर योग्य ती संपुर्ण पुर्तता करणे हे मंजुर निविदा धारक यांचेवर बंधनकारक आहे.तसेच वेळोवेळी शासनाने या व्यवसाय / कामा बाबत कोणताही कायदा अगर नियम लागु केले तर ते मंजुर निविदा धारक यांचेवर बंधनकारक आहेत.

१२.भाविकांनी शनि देवाचे स्वयंभू मुर्तीला खाद्य तेल अर्पण केल्यानंतर निर्माल्य झालेले तेल खाण्या व्यतीरिक्त व धार्मिक विधी व्यतीरिक्त वापराकरिता महाराष्ट्र राज्यात अगर महाराष्ट्र राज्याबाहेर मंजूर निविदा धारक यांना स्वत:च्या जबाबदारीवर घेऊन जावे लागेल.महाराष्ट्र राज्यात अगर महाराष्ट्र राज्याबाहेर निर्माल्य तेल घेऊन जाताना आवश्यक असणारे सर्व प्रकारचे कर मंजुर निविदा धारक यांनी भरावयाचे आहेत.यासाठी देवस्थान संस्था कुठल्याही प्रकारची जबाबदारी स्विकारणार नाही.

१३.अकरा महीन्याचा कालावधी दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ असा राहील.या कालावधीच्या आत व्यवसाय सोडावयाचा असल्यास एक महीना अगोदर लेखी स्वरूपात अर्ज द्यावा लागेल.अशा प्रकारे मुदत पुर्व व्यवसाय सोडल्यास अगर देवस्थानने केलेल्या कारवाईमुळे व्यवसाय सोडावा लागल्यास सदर व्यवसायासाठी भरलेली बयाणा रक्कम रक्कम जप्त केली जाईल या विषयी मंजूर निविदा धारक यांना कुठल्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही व अशा व्यवसाय धारकास काळ्या यादीत सामाविष्ठ करून पुढील निविदा प्रक्रीये मध्ये पुढील ३ वर्षा करिता भाग घेता येणार नाही.

१४.करार कालावधीत दुर्दैवाने मंजूर निविदा धारक मयत झाल्यास व त्यांचे कायदेशिर वारसाने सक्षम अधिकाऱ्याचा दाखला आणून दिल्यास संमतीदर्शक वारसाचे नावे सदरचा व्यवसाय उर्वरीत करार कालावधीसाठी हस्तांतरीत करण्यात येईल.दुर्दैवाने करारकालावधीत मंजूर निविदा धारक यांचे कुठल्याही प्रकारच्या नैसगिक अगर अनैसर्गिक आपत्तीने अथवा कोणत्याही कारणाने जिवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास देवस्थान संस्था जबाबदार राहणार नाही.

१५.ज्यांच्या कडे देवस्थानचा गाळा/जागा/व्यवसाय इ.ची थकबाकी स्वत:चे नावावर किंवा त्यांचे एकत्रित कुटूंबातील घटकाचे नावे आहे त्यांना निविदा अर्ज भरता येणार नाही.

१६.मंजुर निविदा धारकास त्यांनी निविदा अर्जात नमुद केलेल्या परवाणा शुल्क (किलो दर ) रकमेवर सरकारी नियमानुसार होणारी (GST) जीएसटी ५ % अथवा अनुज्ञेय कराची रक्कम अतिरीक्त भरणा करावी लागेल.

१७.उपरोक्त बाबत कोणताही वाद उपस्थित झाल्यास त्या बाबतचे न्यायालयीन कामकाज नेवासा न्यायालयाचे कार्यकक्षेत असेल.

१८.व्यवसाय करताना केंद्र/राज्य अथवा स्थानिक प्रशासन यांचेव्दारा निर्गमित करण्यात आलेले कायदे, नियम अथवा इतर कोणतेही निर्देश यांचे पालन करणे निविदाधारक यांना बंधनकारक असेल.

१९. मंजूर निविदाधारकाने मंजूर दरानुसार निर्माल्य तेल वेळेवर घेऊन न गेल्यास किंवा नाकारल्यास सदरील तेल इतरांना बाजारभावानुसार कमी दराने विक्री करावा लागल्यास होणाऱ्या कमी भाव फरकाची रक्कम मंजूर निविदा धारकाच्या बयाणा रकमेतून वसूल करण्यात येईल व निविदाधारकास पुढील ०३ वर्षे कालावधीकरिता काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्याची कार्यवाही संस्थान प्रशासनाकडून करण्यात येईल.

२०.धार्मिक पावित्र्य आणि आचारसंहिता: देवस्थानचे निर्माल्य तेल घेऊन जाणाऱ्या निविदाधारकाची आणि त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांची श्री शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था असणे अनिवार्य आहे. श्री शनिदेव हे कोट्यवधी भक्तांचे श्रद्धास्थान असून त्यांचे धार्मिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे पूर्णतः पावित्र्य राखून आणि शनिदेवाचे मनोभावे स्मरण करूनच सेवा द्यावी. निविदाधारकाने दररोज शनिदेवाच्या प्रतिमेचे पूजन करणे तसेच भाविकांशी अत्यंत नम्रतेने व सौजन्याने वागणे बंधनकारक असेल. या सर्व अटींच्या पालनाबाबतचे प्रतिज्ञापत्र/प्रमाणपत्र पात्र निविदाधारकाने सादर करणे आवश्यक राहील.

२१.कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न दाखवता नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार देवस्थानचे संस्थेने राखून ठेवलेला आहे.

२२. निविदा अर्ज भरणारांनी निविदा अर्ज भरण्यापुर्वी खालील व्यवसायाचा तपशील अगोदर वाचुन निविदा अर्ज भरावा.

**<u>व्यवसायाचा तपशील</u>**

सदर व्यवसायासाठी खालील तपशिला प्रमाणे ज्या किमान रकमा दर्शविलेल्या आहेत त्या पेक्षा अधिक रकमेचा निविदा अर्ज भरणे आवश्यक आहे.या पेक्षा कमी रकमेचा निविदा अर्ज नाकारण्यात येईल.

| अ.नं. | काम/ व्यवसाय बाबतचा तपशील | कमीत कमी रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री शनिदेवाचे स्वयंभू मुर्तीला भाविकांनी खाद्य तेल अर्पण केल्यानंतर निर्माल्य झालेले तेल खाण्याव्यतीरिक्त व धार्मिक विधी व्यतीरिक्त वापराकरिता अकरा महीन्याच्या कराराने दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या कालावधीत परवाना पध्द्तीने प्रति किलो ग्रॅम दराप्रमाणे विक्री करणे. | रू.८८.२० प्रति किलो ग्रॅम |

स्थळ : शनि शिंगणापूर
दिनांक : २० एप्रिल २०२६

अतुल चोरमारे
कार्यकारी अधिकारी
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्थ व्यवस्था (शिंगणापूर)
ता.नेवासा,जि.अहिल्यानगर

## परिशिष्ट " अ "

## निविदा धारकाबाबतची माहिती

१. फर्मचे/संस्थेचे नाव ---------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवरासाठी संपूर्ण पत्ता-----------------------------------------------------------------

3. दूरध्वनी क्रमांक------------------------------------------------------------

कार्यालय-------------------------------------------------

निवास------------------------------------------------

फॅक्स नंबर----------------------------------------------

ई-मेल-------------------------------------------------------

४. संपर्क साठी व्यक्तीचे नाव-------------------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक ---------------------------------------------------------------------

५. मालकाचे /भागीदारांची नावे १ -------------------------------------------------------

२.-------------------------------------------------------

६. RTGS Details

१. बँक खाते नंबर ----------------------------------------------------

२. बँकेचे नाव--------------------------------------------------------

3. शाखा ------------------------------------------------------------

४.आयएफसी कोड---------------------------------------------------

५. एम आय सी आर कोड -------------------------------------------

**निविदा धारकाचे नाव व स्वाक्षरी**

**शिक्का**

**<u>परिशिष्ट “ ब “</u>**

**<u>तांत्रिक निविदेमधील कागदपत्रे (चेक लिस्ट )</u>**

१) मतदान ओळखपत्र/आधारकार्ड / ड्राईव्हींग लायसेन्स या पैकी एकाची झेरॉक्स

२) पॅन कार्डची प्रमाणित प्रत.

३) निविदा धारकाबाबतची माहिती ( परिशिष्ट अ)

४) कोणत्याही संस्था / शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था यांच्या काळ्या यादीमध्ये समाविष्ट नसल्याचे लेखी प्रतिज्ञापत्र. ( परिशिष्ट ड)

५) अद्यावत दुकान नोंदणी दाखला (शॉप अ‍ॅक्ट) / उद्यम आधार परवाना

६) GST नोंदणी दाखला.

७) श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) यांना निविदा धारकाने द्यावयाचे बंधपत्र ( परिशिष्ट ई)

८) शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था असल्याचे हमीपत्र.

**निविदाधारकाचे नाव व स्वाक्षरी**

**शिक्का**

**परिशिष्ट “ क“**

दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या कालावधी साठीची निर्माल्य झालेले तेल व्यवसाय अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास देणेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.नं. | काम/ व्यवसाय बाबतचा तपशील | प्रति किलो ग्रॅम दर |
|---|---|---|
| १ | श्री शनि देवाचे स्वयंभू मुर्तीला भाविकांनी खाद्य तेल अर्पण केल्यानंतर निर्माल्य झालेले तेल खाण्याव्यतीरिक्त व धार्मिक विधी व्यतीरिक्त वापराकरिता अकरा महीन्याच्या कराराने दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या कालावधीत परवाना पध्द्तीने प्रति किलो ग्रॅम दराप्रमाणे विक्री करणे. | रू. |

मंजुर निविदा धारकास त्यांनी परिशिष्ट “ क “ मध्ये नमुद केलेल्या परवाणा शुल्क (प्रति किलो ग्रॅम दर ) रकमेवर सरकारी नियमानुसार होणारी (GST) जीएसटी ५ % अथवा अनुज्ञेय कराची रक्कम अतिरीक्त भरणा करावी लागेल.

निविदा धारकाचे नाव----------------------------------------------------------

सही --------------------------------------------

दिनांक -     /       /२०२६

**<u>परिशिष्ट " ड "</u>**

**स्वयंघोषणा पत्र**

मी निविदाधारक --------------------------------------------------------------------------------स्वत: प्रमाणित करतो कि मी स्वत: साठी अगर निविदाधारकासाठी कुणीही, कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबित नाही तसेच निविदा धारकाचे नाव संस्थांनचे काळ्या यादीत समावेश नाही. जरी संस्थान विरोधात दावा दाखल केलेला असल्यास सदर निविदाधारकांच्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.

निविदा धारकाचे नाव------------------------------------------------------------

सही -------------------------------------------

दिनांक - / /२०२६

**<u>परिशिष्ट " इ"</u>**

**श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) यांना निविदा धारकाने द्यावयाचे बंधपत्र**

---------------------------------------------------------------------------------------------------------

दिनांक : ____

प्रति,
मा. कार्यकारी अधिकारी,
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर),
ता. नेवासा , जि. अहिल्यानगर

विषय :श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्थ व्यवस्था (शिंगणापूर) ता.नेवासा जि.अहिल्यानगर यांच्या मालकीचे निर्माल्य झालेले तेल खाण्याव्यतीरिक्त व धार्मिक विधी व्यतीरिक्त वापराकरिता व्यवसायासाठी दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या अकरा महीन्याच्या कालावधीसाठी परवाना पध्दतीने अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास देणे करिता निविदा बाबत.

महोदय,

मी / आम्ही खालीलप्रमाणे सही करून लिहून देतो / देतो की, वरील विषयासंबंधी आपण प्रसिद्ध केलेल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचलेल्या असून त्या मला / आम्हाला पूर्णतः मान्य आहेत. आपले अटी व शर्ती पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी / आम्ही आपणास निविदेत नमूद केले प्रमाणे श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्थ व्यवस्था (शिंगणापूर) ता.नेवासा जि.अहिल्यानगर यांच्या मालकीच्या निर्माल्य झालेले तेल खाण्याव्यतीरिक्त व धार्मिक विधी व्यतीरिक्त वापराकरिता या व्यवसायासाठी दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या अकरा महीन्याच्या कालावधीसाठी परवाना पध्दतीने अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास घेणे करिता हमी देतो. तसेच मंजूर व्यवसाया व्यतिरिक्त अन्य व्यवसाय करण्यात येणार नाही. माझ्याकडे देवस्थानचा गाळा/जागा/व्यवसाय इ.ची थकबाकी स्वत:चे नावावर किंवा एकत्रित कुटूंबातील घटकाचे नावे नाही.

माझी/आमची सादर केलेली निर्माल्य झालेले तेल खाण्याव्यतीरिक्त व धार्मिक विधी व्यतीरिक्त वापराकरिता व्यवसायासाठी ची निविदा मंजूर झाल्यास ७ दिवसाच्या आत शासनाने निश्चित केलेल्या नुसार करारनामा देऊ व निर्माल्य झालेले तेल खाण्याव्यतीरिक्त व धार्मिक विधी व्यतीरिक्त वापराकरिता किलो दराने जीएसटी सह संस्थांनकडे जमा करणे विषयांकित मंजूर निविदा दराने रक्कम भरणा करणे माझेवर/ आमच्यावर बंधनकारक राहील त्यात कसूर झाल्यास होणाऱ्या शिक्षेस मी/ आम्ही पात्र राहू असे बंधपत्र देत आहे/ आहोत.

आपला/ आपली विश्वासू

फर्म मालकाचे नावे — सही व शिक्का.

(१)------------------------------------------------------

(२)-------------------------------------------------------

**<u>परिशिष्ट “ ई “</u>**

**<u>शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था असल्याचे हमीपत्र</u>**

**प्रति,**
**मा. कार्यकारी अधिकारी,**
**श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर),**
**ता. नेवासा , जि. अहिल्यानगर**

मी, श्री/सौ/श्रीमती _______________________________________________________ (निविदाधारकाचे नाव), राहणार ________________, याद्वारे खालीलप्रमाणे लेखी हमी/प्रमाणपत्र देतो की:
१. माझी आणि माझ्याकडे काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची श्री शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था आहे.
२. आम्ही श्री शनिदेवाचे धार्मिक महत्त्व आणि भक्तांच्या भावनांचा पूर्ण आदर राखू.
३. संपूर्ण पावित्र्य राखले जाईल आणि व्यावसायिक हेतू सोडून मनोभावे व सेवाभावी वृत्तीने कार्य केले जाईल.
४. श्री शनिदेवाच्या प्रतिमेचे विधीवत पूजन केले जाईल.
५. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांशी मी स्वतः आणि माझे सर्व कर्मचारी अत्यंत नम्रतेने, सौजन्याने आणि आदराने वागतील याची मी पूर्ण जबाबदारी घेत आहे. भाविकांच्या तक्रारीस कोणताही वाव राहणार नाही, याची दक्षता घेतली जाईल.
६. देवस्थानने घालून दिलेल्या सर्व धार्मिक आणि प्रशासकीय नियमांचे मी काटेकोरपणे पालन करेन.
उपरोक्त माहिती आणि अटींचे उल्लंघन झाल्यास, माझा परवाना रद्द करण्याचा किंवा देवस्थान प्रशासनाकडून होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी पात्र राहीन, याची मला जाणीव आहे.

दिनांक:    /    /२०२

स्थळ:

निविदाधारकाची सही: ________

निविदाधारकाचे नाव: _________

मोबाईल क्रमांक: __________

(शिक्का)